इंधन दरवाढीमुळे महागाईच्या लाटेचा इशारा

जूनपर्यंत दर ५ टक्क्यांवर जाण्याचा अर्थतज्ज्ञांचा अंदाज

पीटीआय, नवी दिल्ली

इंधनाच्या किमतीत चौथ्यांदा झालेली वाढ आणि सोने व चांदीवरील आयात शुल्कात वाढविले गेल्यामुळे येत्या जूनमध्ये किरकोळ महागाईचा दर दोन वर्षात प्रथमच ५ टक्क्यांवर जाईल. मोठ्या प्रयत्नांनंतर काबूत आलेल्या महागाईच्या नव्याने लाट उसळण्याचा हा परिणाम पाहता, आर्थिक वर्षातील दुसऱ्या सहामाहीत रिझर्व्ह बँक व्याजदरात वाढ देखील करेल, असा अंदाज मंगळवारी अर्थतज्ज्ञांनी वर्तविला.

देशभरात १५ मेपासून अकरा दिवसांत पेट्रोलच्या दरात लिटरमागे ७.३८ रुपये, तर डिझेलच्या दरात ७.४८ रुपये वाढ झाली आहे. या दरवाढीचा थेट परिणाम विशेषतः वाहतूक आणि साठवणूक क्षेत्रावर गंभीरपणे जाणवणार असून, वीजनिर्मितीवर काही अंशी परिणाम होईल. याचबरोबर सरकारने १३ मे रोजी सोने आणि चांदीवरील आयात शुल्क वाढवून १५ टक्के केले असून, याचाही परिणाम महागाईवर होईल. मे महिन्यातील किरकोळ महागाईची आकडेवारी १२ जूनला जाहीर होणे अपेक्षित आहे.

या पार्श्वभूमीवर 'ईवाय इंडिया'चे मुख्य धोरण सल्लागार डी.के.श्रीवास्तव म्हणाले की, पेट्रोलियम उत्पादनांच्या किमतीत प्रति लिटर सरासरी ७.५ रुपये वाढ झाल्यास किरकोळ महागाईत पाऊण टक्का वाढ होईल. किरकोळ महागाईचा दर मे महिन्यात ४ ते ४.५ टक्के राहील. जूनमध्ये हा दर ४.५ ते ५ टक्क्यांवर जाईल. इंधन दरवाढीमुळे होणारा परिणाम स्थिरावण्याची प्रतीक्षा रिझर्व्ह बँक करेल आणि त्यानंतरच्या तिमाहीत व्याजदर वाढीबाबत निर्णय घेतला जाईल. किरकोळ महागाईचा दर ५ टक्क्यांच्या पुढे गेल्यास रिझर्व्ह बँकेकडून व्याजदर वाढ सुरू होईल. तथापि महागाईतील वाढ ही किमती वाढल्याने होणार असल्याने त्यावर नियंत्रण म्हणून व्याजदरात वाढ केली तरी त्याचा परिणाम मर्यादितच राहिल, असेही श्रीवास्तव म्हणाले.

बार्कलेज इंडियाच्या मुख्य अर्थतज्ज्ञ आस्था गुडवानी म्हणाल्या की, रिझर्व्ह बँकेकडून जूनमधील पतधोरणात व्याजदरात बदल केले जाणार नाहीत. सध्याची अस्थिर परिस्थिती आणि इंधन दरवाढीचा वाहतूक, प्रवास भाडे व कच्च्या मालाच्या किमतीवर होणारा परिणाम यामुळे चालू आर्थिक वर्षातील दुसऱ्या सहामाहीत महागाईत मोठी वाढ होईल. महागाई आटोक्याबाहेर गेल्यास व्याजदर वाढ करणे अपरिहार्य ठरेल.

जूनमधील पतधोरण स्थिर?

रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीच्या द्वैमासिक बैठकीचे निर्णय ५ जूनला जाहीर होतील. या बैठकीत व्याजदर स्थिर ठेवले जातील, असा अर्थतज्ज्ञांचा अंदाज आहे. घाऊक महागाईचा दर एप्रिलमध्ये ८.३ टक्के या ४२ महिन्यांतील उच्चांकी पातळीवर पोहोचला, तर किरकोळ महागाई दर ३.४८ टक्के नोंदविण्यात आला. रिझर्व्ह बँकेकडून व्याजदर ठरविताना प्रामुख्याने किरकोळ महागाई दराचा विचार केला जातो. तथापि या बैठकीत, चालू आर्थिक वर्षातील किरकोळ महागाई दराचा अंदाज ४.६ वरून ५ टक्क्यांवर नेला जाईल. याचबरोबर विकास दराचा अंदाज ६.९ वरून ६.७ टक्क्यांपर्यंत खाली आणला जाण्याची शक्यता आहे.

बँक ऑफ इंडियाकडून व्याजदरात वाढ

पुणे: बँक ऑफ इंडियाने तीन कोटी रुपयांपेक्षा कमी रकमेच्या मध्यम व दीर्घकालीन मुदत ठेवींवरील व्याजदरांमध्ये वाढ केली आहे. १८ मे २०२६ पासून सुधारित दर लागू झाले आहेत.

सुधारित दरानुसार, १ वर्षापेक्षा जास्त आणि २ वर्षांपेक्षा कमी कालावधीसाठी ६.५० टक्के, २ वर्षांपेक्षा जास्त आणि ३ वर्षांपेक्षा कमी कालावधीसाठी ६.६० टक्के, ३ वर्षांच्या कालावधीसाठी ६.७० टक्के दराने व्याज मिळणार आहे. ज्येष्ठ नागरिक आणि अति ज्येष्ठ नागरिकांना ६ महिने ते ३ वर्षांपेक्षा कमी मुदतीच्या ठेवींवर अनुक्रमे अतिरिक्त ०.५० टक्के आणि ०.६५ टक्के अधिक व्याज प्राप्त होईल. तीन वर्षे व त्यापेक्षा अधिक मुदतीच्या ठेवींवर ज्येष्ठ नागरिक व अति ज्येष्ठ नागरिकांना लागू व्याजदरावर अनुक्रमे ०.७५ टक्के व ०.९० टक्के अतिरिक्त व्याज मिळेल. याशिवाय, १ कोटी रुपयांपेक्षा अधिक व किमान १ वर्ष मुदतीच्या नॉन-कॉलेबल मुदत ठेवींवर अतिरिक्त ०.१५ टक्के प्रतिवर्ष व्याज देण्यात येईल.

टाटा सन्सची बैठक पुन्हा निर्णयाविना?

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी

मुंबई: देशातील आघाडीच्या टाटा उद्योग समूहाची पालक कंपनी असलेल्या टाटा सन्स प्रायव्हेट लिमिटेडच्या संचालक मंडळाची अनेकांगाने महत्त्वपूर्ण बैठक मंगळवारी तब्बल पाच तास चालली. बैठकीनंतर सर्व संचालकांनी निर्णयाबाबत कमालीचे मौन बाळगले असले तरी प्रत्यक्षात कोणत्याही औपचारिक निर्णयाविनाच बैठक उरकण्यात आली, अशी माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली.

या बैठकीसाठी टाटा समूहाचे मुख्यालय असलेल्या बॉम्बे हाऊसमध्ये टाटा सन्सचे सर्व संचालक आणि टाटा कुटुंबातील सदस्य आणि टाटा न्यासांचे अध्यक्ष नोएल टाटा हे सकाळीच दाखल झाले. एकंदर पाच तास ही बैठक चालली. त्यानंतर दुपारी उशिराने सर्व संचालक तेथून बाहेर पडले. टाटा सन्सचे अध्यक्ष एन.चंद्रशेखरन यांनीही माध्यमांशी बैठकीतील निर्णयांबाबत बोलणे टाळले. या बैठकीत त्यांच्या पुनर्नियुक्तीच्या मुद्द्यावर चर्चा झाली नसल्याचे समजते.

टाटा समूहातील कंपन्यांच्या आर्थिक कामगिरीबाबत चंद्रशेखरन आणि नोएल टाटा या दोघांमध्ये मागील आठवड्याच्या अखेरीस चर्चा झाल्याचे सांगितले जाते.

अंतर्गत वादाची किनार

टाटा समूहातील कंपन्यांच्या वाढत्या तोट्याबाबत नोएल टाटा हे चिंतित आहेत. त्यात प्रामुख्याने चंद्रशेखरन यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेले टाटा डिजिटल आणि इतर इलेक्ट्रॉनिक व्यवसाय तसेच, एअर इंडिया या कंपनीचा समावेश आहे. काही वर्षांपूर्वी टाटा समूहाने सरकारकडून एअर इंडिया विकत घेऊन, नागरी विमानोड्डाण क्षेत्रात प्रवेश केला. याचबरोबर टाटा सन्सच्या शेअर बाजारात प्रारंभिक समभाग विक्रीद्वारे (आयपीओ) सूचिबद्धतेसही नोएल टाटा यांचा विरोध आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली. रिझर्व्ह बँकेने देशातील १५ उच्च श्रेणी बँकेतर वित्तीय कंपन्यांत टाटा सन्सचा समावेश केला असून, भांडवली बाजारात सूचिबद्ध होणे तिच्यासाठी बंधनकारक आहे. नोएल टाटा यांनी त्यांचे पुत्र नेविल यांना कुटुंबातील काहींना न्यास आणि संलग्न संस्थांमध्ये सदस्य म्हणून घेतले आहे.

जाहीर सूचना

याद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की आम्ही खाली परिशिष्टामध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या मालमत्तेसंदर्भात पुढील संस्थांच्या मालकी हक्कांची चौकशी / पडताळणी करीत आहोत : **१) जीआरपीएल रियल्टी एलएलपी,** ही मर्यादित दायित्व भागीदारी संस्था असून तिचा एलएलपी ओळख क्र. एएबी-४८६२ आहे व तिचे नोंदणीकृत कार्यालय पी-११-१२, साऊथ एक्सटेंशन, पार्ट-२, नवी दिल्ली, दिल्ली, भारत - ११०४९ येथे आहे. **२) झेटा प्रॉपर्टी होल्डिंग प्रायव्हेट लिमिटेड,** ही कंपनी असून तिचा सीआयएन क्र. यू६८२००पीएन२०२३पीटीसी२२०५१४ आहे व तिचे नोंदणीकृत कार्यालय ३०१-३०२, ज्वेल टॉवर, लेन क्र. ५, कोरेगाव पार्क, पुणे, महाराष्ट्र - ४११००१ येथे आहे.

सदर मालमत्तेबाबत कोणत्याही व्यक्ती/संस्थेला विक्री, अदलाबदल, भाडेकरार, उपभाडेकरार, लायसन्स, उपलायसन्स, भाडेहक्क हस्तांतरण, गहाण, वारसा, मृत्युपत्र, उत्तराधिकार, भेट, लियन, हमी/तारण, हायपोथिकेशन, चार्ज, देखभाल हक्क, उपभोग हक्क, ट्रस्ट, ताबा, कौटुंबिक व्यवस्था/समझोता, न्यायालयाचा हुकूम किंवा आदेश, करार/समझोते, सामंजस्य करार, लेटर ऑफ इंटेंट/हेड ऑफ टर्म्स, विकास हक्क, मार्गाचा हक्क, प्रलंबित खटला, आरक्षण, पॉवर ऑफ टर्नी, पर्याय हक्क, एफएसआय वापर हक्क, प्रथम नकाराचा हक्क, भागीदारी, प्री-एम्प्शन किंवा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क, दावा, स्वारस्य, लाभ, मागणी, दायित्व किंवा बांधिलकी असल्यास त्यांनी त्याबाबतचे लेखी निवेदन तसेच कागदोपत्री पुरावे खाली सही करणाऱ्यांकडे खाली नमूद पत्त्यावर तसेच ईमेलद्वारे Bhushan.Panse@dsklegal.com येथे या सार्वजनिक नोटिशीच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून **१५ दिवसांच्या** आत सादर करावेत. सदर मालमत्ता या विस्ट्रा आयटीसीएल (इंडिया) लिमिटेड यांच्याकडे गहाण ठेवण्यात आलेल्या आहेत. निर्धारित मुदतीत कोणताही दावा प्राप्त न झाल्यास, असा कोणताही दावा अस्तित्वात नाही किंवा तो सोडून देण्यात आलेला / त्याग करण्यात आलेला आहे असे समजण्यात येईल. या सार्वजनिक नोटिशीला प्रतिसाद म्हणून पाठविण्यात येणाऱ्या सर्व दाव्यांमध्ये B0632 हा संदर्भ क्रमांक नमूद करणे आवश्यक राहील.

मालमत्तेचे परिशिष्ट

खालील सर्व्हे क्र. धारण करणारा आणि पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यात, हडपसर गावी स्थित असलेला, एकूण १४,६७०.९८ चौरस मीटर क्षेत्रफळाचा जमिनीचा संपूर्ण तुकडा किंवा भूखंड:

सर्व्हे क्रमांक	क्षेत्रफळ
१७१/५/६/७/४बी/१६/१/२/ भूखंड अ (निव्वळ क्षेत्र)	११,२३१.६१ चौरस मीटर
१७१/५/६/७/४बी/१६/१/२/ भूखंड ब (सुविधा जागा)	२,२२९.९५ चौरस मीटर
१७१/५/६/७/४बी/१६/१/२/ भूखंड ड (अंतर्गत रस्ता)	८४०.३४ चौरस मीटर
१७१/५/६/७/४बी/१६/१/२/ भूखंड इ (सेवा रस्ता)	३६९.०८ चौरस मीटर

आणि एकत्रितपणे सदर मालमत्तेच्या सीमा पुढीलप्रमाणे आहेत :

पूर्वेस : सर्व्हे क्र. १७१/१३, १७१/१४ए व १७१/१५, हडपसर येथील उर्वरित जमिनीने सीमांकित
दक्षिणेस : सर्व्हे क्र. १७१/१७, हडपसर येथील जमिनीने सीमांकित
पश्चिमेस : नाल्याने सीमांकित
उत्तरेस : सर्व्हे क्र. १७१ हिस्सा क्र. १+२+३+४ए+८+९+१०+११/१, हडपसर येथील जमिनीने सीमांकित

दिनांक : २७ मे, २०२६

भूषण पानसे
भागिदार
डीएसके लिगल
वकील आणि सॉलिसिटर्स
कार्यालय क्र.२, तळमजला, १ मोदी बाग, गणेश खिंड रोड, शिवाजी नगर, पुणे-४११०१६

सीएसबी बँक लिमिटेड

CIN: L65191KL1920PLC000175

कॉर्पोरेट कार्यालय: सिरोया सेंटर, आयटीसी मराठा हॉटेल जवळ, सहार रोड, अंधेरी पूर्व, मुंबई- 400099. फोन: 022-69808617, ई-मेल: westernzone@csb.co.in

CSB Bank

सर्फेसी कायद्याच्या कलम 13 (2) अंतर्गत मागणी सूचना

1. मे. काळे असोसिएट्स (कर्जदार) प्रोप्रा. किशोर देविदास काळे
पत्ता 1: 412, अमित कोर्ट, शिवाजीनगर, मंगला थिएटरच्या मागे, पुणे 411005. **पत्ता 2:** राज्य वाहन सेवक सहकारी गृहनिर्माण सोसायटी लि. च्या पहिल्या, दुसरया, तिसरया आणि चौथ्या मजल्यावरील सदनिका, प्लॉट क्र. 128, अरण्येश्वर इंग्लिश मीडियम स्कूलच्या मागे, तळजाई मंदिर रोड, गाव पर्वती, तालुका हवेली, जिल्हा पुणे, 411009.
2. श्री. किशोर देविदास काळे (सह-कर्जदार) श्री. देविदास काळे यांचा मुलगा
पत्ता 1: 500/1, मेहून पुरा जोशी संकुल, फ्लॅट नं. 5अ, शनिवार पेठ, पुणे शहर, एसपी कॉलेज, पुणे शहर, पुणे 411030. **पत्ता 2:** 412, अमित कोर्ट, शिवाजीनगर, मंगला थिएटरच्या मागे, पुणे 411005. **पत्ता 3:** राज्य वाहन सेवक सहकारी गृहनिर्माण सोसायटी लि. च्या पहिल्या, दुसरया, तिसरया आणि चौथ्या मजल्यावरील सदनिका, प्लॉट क्र. 128, अरण्येश्वर इंग्लिश मीडियम स्कूलच्या मागे, तळजाई मंदिर रोड, गाव पर्वती, तालुका हवेली, जिल्हा पुणे, 411009.
3. श्री. आशा किशोर काळे (सह-कर्जदार) श्री. किशोर काळे यांची पत्नी
पत्ता 1: 500/1, मेहून पुरा जोशी संकुल, फ्लॅट नं. 5अ, शनिवार पेठ, पुणे शहर, एसपी कॉलेज, पुणे शहर, पुणे 411030. **पत्ता 2:** 412, अमित कोर्ट, शिवाजीनगर, मंगला थिएटरच्या मागे, पुणे 411005. **पत्ता 3:** राज्य वाहन सेवक सहकारी गृहनिर्माण सोसायटी लि. च्या पहिल्या, दुसरया, तिसरया आणि चौथ्या मजल्यावरील सदनिका, प्लॉट क्र. 128, अरण्येश्वर इंग्लिश मीडियम स्कूलच्या मागे, तळजाई मंदिर रोड, गाव पर्वती, तालुका हवेली, जिल्हा पुणे, 411009.
महोदय,
तुम्हास मंजूर केलेल्या पत सुविधेअंतर्गत **सीएसबी बँक लि. पूर्वीची दि कॅथोलिक सिरियन बँक लि., मार्केटयार्ड पुणे शाखा यांना पुढील व्याजासह 07.04.2026 रोजी नुसार रु. 3,25,91,902/- (रुपये तीन कोटी पंचवीस लाख एक्क्याण्णव हजार नऊशे दोन फक्त)** ही रक्कम तुम्ही देय आहात. बँकेच्या देणींची परतफेड करण्यात तुमच्याकडून कसूर झाल्यामुळे खात्याचे 07.04.2026 रोजी एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आले आहे. रजि. ए/डी द्वारे सर्फेसी कायदा 2002 च्या कलम 13(2) अंतर्गत **दिनांकित 10.04.2026** आमच्याकडून तुम्हास सूचना पाठविण्यात आली होती, आणि जर तुम्ही या सूचनेच्या 60 दिवसांच्या आत पुढील व्याज व खर्चासह उक्त ?णांची परतफेड करण्यात असमर्थ ठरलात, तर बँक खाली वर्णिलेल्या बँकेच्या नावे तुमच्याकडून देय असलेल्या सुरक्षा व्याजाची अंमलबजावणी अंतर्भूत याद्वारा कायद्याअंतर्गत सर्व किंवा कोणत्याही हक्कांची अंमलबजावणी करेल.
अ) पुढील तारण मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे, पहिल्या, दुसरया, तिसरया आणि चौथ्या मजल्यावरील निवासी सदनिका, राज्य वहातुक सेवक सहकारी गृहनिर्माण संस्था लि., प्लॉट क्र. 128, सीटीएस क्र. 1703, स. क्र. 85 व 86, अरण्येश्वर इंग्लिश मीडियम स्कूलच्या मागे, तळजाई मंदिर रोड, गाव पर्वती, तालुका हवेली, जिल्हा पुणे, 411009. श्री. किशोर देविदास काळे यांच्या मालकीचे आणि **चतुःसीमा पुढीलप्रमाणे:- पूर्व किंवा त्या दिशेने: प्लॉट क्र. 129, दक्षिण किंवा त्या दिशेने: रस्ता, पश्चिम किंवा त्या दिशेने: प्लॉट क्र. 127, उत्तर किंवा त्या दिशेने: अरण्येश्वर विद्या मंदिर.**
तुम्हास पाठविण्यात आलेली **दिनांकित 10.04.2026 रोजीची** सूचना पोचवणी न होताच परत आली आहे, यामुळे आम्हास ही सूचना प्रसिद्ध करण्यास भाग पडले आहे. तुम्हास या सुचनेच्या 60 दिवसांच्या आत वर नमूद केलेल्या दायित्वांचे विमोचन करण्याकरिता याद्वारा वरील कायद्याच्या कलम 13 (2) अंतर्गत फर्माविण्यात आले आहे, त्यास असमर्थ ठरल्यास वरील कायद्याअंतर्गत बँक प्रक्रिया सुरू करील. तुम्ही याची सुद्धा नोंद घ्यावी की वरील कायद्याच्या कलम 13 (13) च्या अनुसार तुम्हास पूर्वोक्त सुरक्षित मत्तेची विक्री, भाडेपट्टयाने देणे किंवा अन्यथा कोणत्याही मार्गाने हस्तांतरण करता येणार नाही.
ही सूचना कायदेशीर प्रक्रिया किंवा कायद्याच्या अन्य कोणत्याही तरतूदीअंतर्गत देणींच्या वसुलीकरिता बँकेच्या कोणत्याही पूर्वग्रहाशिवाय निर्गमित करण्यात आली आहे.

दिनांक: 27.05.2026, ठिकाण: मुंबई — **प्राधिकृत अधिकारी, सीएसबी बँक लिमिटेड**

asREC (India) Limited

बिल्डींग क्र. 2, युनिट क्र. 201-202ए आणि 200- 202बी, तळ मजला, सॉलिटेअर कॉर्पोरेट पार्क, अंधेरी घाटकोपर लिंक रोड, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई - 400 093.

परिशिष्ट-IV-A
अचल मालमत्तेच्या ई-लिलाव - विक्रीसाठी जाहीर सूचना
(सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल, 2002 मधील नियम 9 सह वाचण्यात येणाऱ्या नियम 8(6) अंतर्गत)

ज्याअर्थी,
ॲसरेक (इंडिया) लिमिटेड ही सिक्युरिटायझेशन अँड ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी (यापुढे "**ॲसरेक**" असा उल्लेख करण्यात येईल) आणि **दि. 26.08.2020** रोजी **अभ्युदय को-ऑप बँक लिमिटेड ("एसीबीएल")** यांचे सह झालेल्या अभिहस्तांकन कराराच्या आधारे कर्जदार खाते नावाचे सुरक्षित धनको आहेत, आणि मूळ धनको **अभ्युदय को-ऑप बँक लिमिटेड ("एसीबीएल")** यांच्या कडून **मिराज सिरॅमिक्स प्रायव्हेट लिमिटेड** आणि त्याचे **संचालक / कर्जदार / जामीनदार / गहाणदार (i) मिराज सिरॅमिक्स प्रायव्हेट लिमिटेड,** द्वारे त्याचे **परिसमापक, श्री भास्कर शेट्टी, (ii) श्रीकांत खाडिलकर, संचालक आणि जामीनदार (iii) रौनक खाडिलकर, संचालक आणि जामीनदार,** यांचे सुरक्षित कर्ज अंतर्निहित अनामतीसह अधिग्रहित केले आहे.
अभ्युदय को-ऑप बँक लिमिटेड ("एसीबीएल") च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 (सर्फेसी) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत सदर अधिनियमातील अनु. 13 (2) अंतर्गत **दि. 02.03.2019** रोजी एक **मागणी सूचना** पाठविली ज्यात **उपरोक्त संचालक / कर्जदार / गहाणदार / जामीनदार यांना अभ्युदय को-ऑप बँक लिमिटेड ("एसीबीएल")** यांनी **संचालक / कर्जदार / गहाणदार / जामीनदार** यांना दिलेल्या अग्रिमांच्या संदर्भात **दि. 28.02.2019 रोजी** नुसार **थकबाकी रक्कम रु. 20,59,78,012.14/- (रुपये वीस कोटी एकोणसाठ लाख अठ्ठ्याहत्तर हजार बारा आणि चौदा पैसे फक्त)** ची दिलेल्या अग्रिमांच्या संदर्भात, जर असेल तर वसुली समायोजित केल्यानंतर, त्यावर पुढील व्याजासह **60 दिवसांच्या विहित कालावधीत** परतफेड करण्याचे आवाहन करण्यात आले होते.
संचालक / कर्जदार / गहाणदार / जामीनदार यांनी अनु. 13 (2) अंतर्गत **दि. 02.03.2019 रोजीच्या** सदर मागणी सूचनेनुसार विहित कालावधीत भरणा न केल्याने **अभ्युदय को-ऑप बँक लिमिटेड ("एसीबीएल")** च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटीज (इंटरेस्ट) रुल्स, 2002 सह वाचण्यात येणाऱ्या अनुच्छेद 13 (4) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत **दि. 12.12.2019** रोजी खाली नमूद अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या **मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा घेतलेला आहे.**
दि. 26.08.2020 रोजीच्या अभिहस्तांकन कराराच्या अनुषंगाने **ॲसरेक (इंडिया) लि.** यांनी सर्फेसी अधिनियम, 2002 मधील अनुच्छेद 5 अंतर्गत **अभ्युदय को-ऑप बँक लिमिटेड ("एसीबीएल")** यांचेकडून वर नमूद कर्जदाराच्या वित्तीय मत्ता सर्व अधिकार, मालकी हक्क व स्वास्त्य आणि अंतर्निहित हितसंबंधांसह अधिग्रहित केलेल्या आहेत.
याद्वारे संचालक / कर्जदार / गहाणदार / जामीनदार आणि सर्व लोकांना याद्वारे सूचित करण्यात येते की थकबाकीच्या वसुलीसाठी **ॲसरेक (इंडिया) लि. चे** प्राधिकृत अधिकारी खाली नमूद अनामत मत्तेची विक्री करू इच्छितात आणि त्यामुळे अनामत मत्तेच्या खरेदीसाठी मोहरबंद लिफाफ्यांमध्ये निविदा / बोली आमंत्रित आहेत. मालमत्तांची विक्री पूर्णपणे **'जशी आहे जेथे आहे', 'जशी आहे जे काही आहे' आणि 'जशी आहे तेथे जे काही आहे' आणि 'कुठलाही उपाय नाही'** तत्त्वांवर करण्यात येईल.

अ. क्र.	सुरक्षित मालमत्तेचे वर्णन	राखीव किंमत (रु. लाखात)	बयाणा रक्कम (रु. लाखात)	बोली वृद्धी मूल्य (रु. मध्ये)
1.	गट क्र. 94/1 (जुना गट क्र. 297/1) मोजमाप 1 हेक्टर 93 आर्स (19300 चौ. मीटर) आणि गट क्र. 94/2 (जुना गट क्र. 297/2) 4 हेक्टर 47 आर्स (44700 चौ. मीटर) सोबत तेथील औद्योगिक इमारत / संरचना मोजमाप 25,556.77 चौ. मीटर, गाव नांदूर, तहसील दौंड, जि. पुणे येथे स्थित आणि नांदूर ग्रामपंचायतीच्या स्थानिक हद्दीत, सहजपूर, मे. मिराज सिरॅमिक्स प्रा. लि. च्या मालकीचे असलेले औद्योगिक क्षेत्र सोबत प्लांट आणि मशिनरी आणि स्टॉक आणि बुक कर्जासह.	2391.00	240.00	10.00
2.	प्लांट आणि मशिनरीजचे गृहीतक			
3.	स्टॉक आणि बुक कर्जाचे गृहीतक			

लिलावाचे तपशील :
मालमत्तेची तपासणी : दि. 10.06.2026 रोजी सकाळी 11.30 ते दुपारी 02.30 वा.
बोली फॉर्म सादर करण्याची शेवटची दिनांक आणि वेळ : 16.06.2026 रोजी दुपारी 4.00 पर्यंत.
ई-लिलाव दिनांक : दि. 17.06.2026 रोजी सकाळी 11:00 ते दुपारी 02:00 पर्यंत
अटी व शर्ती :-
1. प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या उत्तम ज्ञान आणि माहितीनुसार, मालमत्तेवर कोणतेही भार नाहीत. इच्छूक बोलीदारांनी त्यांच्या बोली सादर करण्यापूर्वी मालमत्तेवरील बोजा, मालमत्तेचे टायटल आणि मालमत्तेवर परिणाम करणारे दावे / हक्क / देय याविषयी स्वतःची स्वतंत्र चौकशी करावी. ई-लिलाव जाहिरात **ॲसरेक** ची कोणतीही बांधिलकी किंवा कोणतेही प्रतिनिधीत्व सिद्ध होत नाही व त्याशी बांधील असणार नाही. मालमत्तेची विक्रि **ॲसरेक** ला ज्ञात असलेल्या किंवा ज्ञात नसलेल्या सर्व विद्यमान भारासह करण्यात येत आहे. प्राधिकृत अधिकारी / सुरक्षित धनको कोणत्याही त्रयस्थ पक्षकाराचे दावे / हक्क / मते याकरिता कोणत्याही तरहेने जबाबदार असणार नाही.
2. लिलाव वर नमूद केलेल्या संपूर्ण मालमत्तेसाठी **'जशी आहे जेथे आहे', 'जशी आहे जे काही आहे' आणि 'जशी आहे तेथे जे काही आहे' आणि 'कुठलाही उपाय नाही'** तत्त्वांवर आयोजित करण्यात येईल.
3. ई-लिलावाचे आयोजन **ॲसरेक** चे मान्यताप्राप्त सेवा पुरवठाकार **मे. ई-प्रोक्योरमेंट टेक्नॉलॉजीज प्रा. लि. (ऑक्शन टायगर)** यांची वेबसाइट : **https://sarfaesi.auctiontiger.net** वर **(मे. ई-प्रोक्योरमेंट टेक्नॉलॉजीज प्रा. लि. (ऑक्शन टायगर)** यांचे वेब पोर्टल) द्वारा "**ऑनलाईन इलेक्ट्रॉनिक बिडींग**" अंतर्गत केले जाणार आहे. ऑनलाईन ई-लिलाव बोली प्रपत्रे, उदघोषणा, ऑनलाईन ई-लिलावाच्या सर्वसाधारण शर्ती व अटी : **www.asrecindia.co.in** आणि **https://sarfaesi.auctiontiger.net** या वेबसाईट्सवर उपलब्ध आहेत. स्वारस्य असलेल्या बोलीदारांजवळ वैद्य ई-मेल पत्ता असावा. **संपर्क साधावा : मे. ई-प्रोक्युअरमेंट टेक्नॉलॉजीज प्रा. लि. (ऑक्शन टायगर) - श्री. राम शर्मा, मो. : +91 8000023297, हेल्प लाईन क्र. : (+91- 9265562821 / 9265562818, ईमेल : support@auctiontiger.net आणि ramprasad@auctiontiger.net.**
4. सूचीवद्ध बोलीदारांची नोंदणी सेवा पुरवठाकाराद्वारा पार पाडण्यात येईल आणि युजर आयडी किंवा पासवर्ड ई-मेलद्वारा बोलीदारांना देण्यात येईल. बोलीदारांना विनामूल्य ई-लिलावावर आवश्यक प्रशिक्षणाची तरतूद करून देण्यात येईल. ॲसरेक किंवा सेवा पुरवठाकार नेटवर्कमधील अडथळ्यामुळे बोलीदारांच्या चुका / अकार्यक्षमता याबाबत जबाबदार असणार नाहीत. सदर परिस्थितीला सामोरे जाण्याकरिता बोलीदारांना सल्ला देण्यात देण्यात येतो की त्यांनी पर्यायी पॉवर बॅक-अप, इ. सारख्या सर्व आवश्कतांची तरतूद करावी.
5. निविदा दस्तऐवजात दिलेल्या विहित नमुन्यातील बोली **ॲसरेक (इंडिया) लिमिटेड** च्या प्राधिकृत अधिकाऱ्याकडे बिल्डिग क्र. 2, युनिट क्रमांक 201-202ए आणि 200-202बी, तळमजला, सॉलिटेअर कॉर्पोरेट पार्क, अंधेरी घाटकोपर लिंक रोड, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई - 400093 येथे सादर करण्यात यावी **किंवा tushar.shinde@asrec.co.in / navinanchan@asrecindia.co.in या ईमेलद्वारे सादर करावेत. बोली फॉर्म सादर करण्याची शेवटची तारीख 16.06.2026 दुपारी 4.00 पर्यंत आहे. दि. 16.06.2026 रोजी दुपारी 4.00 नंतर प्राप्त झालेल्या बोलीचा फॉर्म किंवा बयाणा रक्कम (ईएमडी) कोणत्याही कारणास्तव स्वीकारले जाणार नाही. बयाणा रकमेशिवाय सादर केलेली बोली सरसकट नाकारली जाईल.**
6. यशस्वी बोलीदाराची बयाणा रक्कम ठेव (इरठे) विक्रिच्या विचाराधीन घेतली जाईल आणि अयशस्वी बोलीदारांची बयाणा रक्कम ठेव सदर पद्धतीत परत केली जाईल. बयाणा रक्कमे वर कोणतेही व्याज मिळणार नाही. बोलीदारांना विनंती करण्यात येते की त्यांनी जलद आणि योग्य परतावा सुकर होण्याकरिता त्यांच्या बँक अकाउंटचा तपशील द्यावा.
7. स्वारस्य असलेले बोलीदार / खरेदीदारांनी बयाणा रक्कम एकतर **बँक ऑफ इंडिया, एसएसआय, अंधेरी शाखा, लाभार्थीचे नाव : ॲसरेक-पीएस-02/2020-21 ट्रस्ट, खाते क्रमांक : 009020110001491, आयएफएससी कोड : BKID0000090 या खात्यात एनईएफटी / आरटीजीएस द्वारा किंवा ॲसरेक-पीएस-02/2020-21 ट्रस्ट च्या** नावे कोणत्याही राष्ट्रीयकृत किंवा अनुसूचित बँकेवर काढलेले आणि मुंबई येथे देय डिमांड ड्राफ्टद्वारे सादर करण्यात यावे.
8. यशस्वी बोलीदार त्वरित म्हणजेच त्याच दिवशी किंवा उशिरात उशिरा कामाच्या पुढील दिवशी, जसे असेल त्यानुसार, विक्रि किमतीच्या 25% रक्कम (भरणा केलेली बयाणा रक्कम सामविष्ट) प्राधिकृत अधिकारीकडे जमा करावी आणि त्यास कसूर झाल्यास, बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल आणि मालमत्ता पुन्हा विक्रिकरिता ठेवण्यात येईल.
9. विक्रि किमतीची उर्वरित रक्कम मालमत्तेच्या विक्रिच्या निश्चितीकरणाच्या 15व्या दिवशी किंवा तत्पूर्वी किंवा सदर विस्तारित कालावधीत जो सुरक्षित धनको व यशस्वी बोलीदारदरम्यान लेखी विनंतीनुसार मान्यतेअधीन प्रदान करावयाची आहे. वरील विनिर्दिष्ट वेळेत प्रदानास कसूर झाल्यास डिपॉझिट जप्त करण्यात येईल आणि मालमत्तेची पुनर्विक्रि करण्यात येईल आणि कसूर करणारे खरीददार मालमत्तेवरील सर्व दावे किंवा कोणतीही रक्कम गमावेल, ज्याकरिता तदनंतर मालमत्तेची विक्रि करण्यात येईल.
10. विक्री सिक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट 2002 च्या नियम / शर्तींच्या अधीन असेल.
11. बयाणा रकमेशिवाय आणि / किंवा राखीव किंमतीपेक्षा कमी असलेली बोली स्वीकारली जाणार नाही / तिची पुष्टी केली जाणार नाही.
12. इच्छुक बोलीदार **दि. 10.06.2026 रोजी सकाळी 11.30 ते दुपारी 02.30 वाजता मालमत्तेची तपासणी करू शकतात. संपर्क तपशील : श्री. तुषार शिंदे - मो. क्र. 9930947393, 022 - 61387037, श्री. नवीन आंचन - मो. क्र. 9820250145, 022 - 61387025 आणि श्री. जगदीश शहा - मो. क्र. 9819931487, 022-61387042 वर कोणत्याही प्रश्नासाठी संपर्क साधा.**
13. प्राधिकृत अधिकारी त्याकरिता कोणतेही कारण न दाखवता कोणतेही किंवा सर्व प्रस्ताव / बोली स्वीकारण्याचा किंवा नामंजूर करण्याचा आणि / किंवा कोणत्याही शर्ती व अटींमध्ये फेरबदल करण्याचा हक्क राखून